# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/05/2023 (बुधवार) सकाळ

## जनावर वाहतुकीचा ट्रक पळविणाऱ्या टोळीचा मोरक्या गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई
## एकुण ८,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन सावनेर नागपूर ग्रामीण च्या हद्दीत दिनांक ११ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. सुमारास काही अनोळखी इसम चार चाकी वाहनातून येऊन सावनेर मोहपा बायपास रोडवर एक आयसर गाडी क्र. MH 40 CM 0519 या वाहनातून जनावराची वाहतूक होत असताना सदरच्या वाहनास थांबवून वाहन चालकास व वाहकास खाली उतरवून जनावरांनी भरून असलेला ट्रक जबरीने पळवून नेला अशा ट्रक मालकाच्या फिर्यादी वरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अपराध क्रमांक २९६/२३ कलम ३४१, ३९२ भारतीय दंड संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणच्या वतीने करण्यात येत होता.

आज दिनांक ३ मे २०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपास करीत असताना गोपनीय खबर प्राप्त झाली की नमूद गुन्ह्यातील चोरीस गेलेला आयसर गाडी क्र. MH 40 CM 0519 हे वाहन छिंदवाडा रोडने सावनेरच्या दिशेने येत असल्याचे माहिती मिळाली सदर माहितीचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सापळा रचून ट्रक चालकास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव अन्सार उर्फ इमरान खान वल्द अशरफ खान वय ३० वर्ष राहणार बडेगाव तालुका अमर वाडा जिल्हा छिंदवाडा मध्य प्रदेश असे सांगितले त्याच्या ताब्यातील ट्रक हा पोलीस स्टेशन सावनेर येथील जबरी गुन्ह्यातील चोरीस गेलेला ट्रक असल्याने त्यास विश्वासात घेऊन गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता आरोपी नामे अन्सार ऊर्फ इमरान खान यांनी त्याच्या इतर तीन साथीदारांसह गुन्हा केल्याचे मान्य केले. सदर आरोपीतांनी नमुद गुन्हा हा त्यांनी गुन्हा हा आर्थिक विवंचनेतून केल्याचे सांगून ट्रक मधील जनावर हे त्याच्या इतर साथीदारांनी नागपूर येथे विकल्याचे सांगितले नमूद आरोपी नामे अन्सार ऊर्फ इमरान खान यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला ट्रक आयसर गाडी क्र. MH 40 CM 0519 किंमती अंदाजे ८,००,०००/— रुपये व नगदी ४०,०००/— रुपये असा एकूण ८,४०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून पुढील कायदेशीर कारवाई करिता पोलीस स्टेशन सावनेर यांच्या ताब्यात देण्यात आले. तसेच उर्वरीत ३ आरोपींताचा शोध सुरू आहे. नमूद गुन्ह्यात पकडण्यात आलेला **आरोपी नामे अन्सार उर्फ इम्रान खान वल्द अशरफ खान, वय ३० वर्ष, राहणार मु. बळेगाव ता. अमरवाडा जिल्हा छिंदवाडा मध्य प्रदेश** हा छिंदवाडा जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत वेगवेगळया कलमाखालील एकूण १० गुन्ह्यांमध्ये मागील काही वर्षापासून फरार असून मध्यप्रदेश पोलीस त्याचा शोध घेत होते परंतु त्यांना मिळून आला नाही. स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणच्या पथकाने विशेष प्रयत्न करून सदर आरोपीस पकडले.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राजीव कर्मलवार, आशिषसिंग ठाकूर , पोहवा राजेंद्र रेवतकर, नापोशी आशिष मुंगले, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल यांच्या पथकाने पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर